# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा—हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०४९ /२०१०

अर्जदार : श्री विजय हरीभाऊ दारव्हेकर
राहणार वसंतनगर, जुना बाभुळखेडा,
रामेश्वरी रोड,
नागपुर

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
महाल विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपुर.

गणपुर्ती : 1) श्रीमती के.के घरत
सदस्य—सचिव,
ग्राहक गा—हाणे निवारण मंच
नाशप, नागपुर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा—हाणे निवारण मंच,
नाशप, नागपुर.

— आदेश ——

पारीत दि. ११.०८.२०१०

ग्राहक गा—हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ०६.०७.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री विजय हरीभाऊ दारव्हेकर, अर्जदार, रा. रामेश्वरी रोड, नागपूर यांनी १५.०३.२०१० रोजी नवीन वीज जोडणी करिता गैरअर्जदाराच्या भगवान नगर शाखा येथे अर्ज केला होता. परंतु वीज जोडणी न मिळाल्याने त्यांनी दिनांक २९.०४.२०१० रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, नागपुर शहर मंडळ येथे तक्रार दाखल केली होती. तिथुन सुध्दा कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अर्जदाराने दि. ०३.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की ––

   अ. त्यांना गैरअर्जदारतर्फे नवीन वीज जोडणी देण्यात यावी.

   ब. वरील कारणास्तव झालेल्या मानसीक व शारीरिक त्रासाकरिता भरपाई देण्यात यावी.

२. अर्जदार यांनी मंचात दाखल केलेल्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की त्यांनी नवीन वीज जोडणी करिता दिनांक १५.०३.२०१० रोजी अर्ज दाखल करून सुध्दा अद्यापही वीज जोडणी मिळाली नाही. या विषयी गैरअर्जदारातर्फे त्यांना असे कळविण्यात आले की अर्जदाराच्या प्लॉटवर पुर्वी ग्राहक क्रं. ४१००१३९६४०६० व मीटर क्रं. ०९०३८९७ असलेला विद्युत पुरवठा होता व त्या जागी विद्युत देयकाची थकबाकी आहे.

अर्जदाराने पुढे असेही नमुद केले आहे की त्या जागी पुर्वी त्यांचे राहणे नव्हते, तेव्हा विद्युत थकबाकी विषयी त्यांना काहीही माहिती नाही. परंतु जेव्हा अर्जदाराने या विषयी गैरअर्जदारास सखोल माहिती विचारली तेव्हा त्यांना सांगण्यात आले की ग्राहक क्रंमाक चुकीचा असल्याने ते माहिती पुरवू शकत नाहीत. गैरअर्जदार अशा

त–हेने नवीन वीज जोडणी करिता टाळाटाळ करून दिशाभुल करीत असल्याची तक्रार अर्जदाराने केली आहे.

३. अर्जदाराने पुढे आपल्या अर्जात असे नमुद केले आहे कि वीज पुरवठया अभावी त्यांच्या मुलांचा शिक्षणाचे नुकसान होत आहे, त्यामुळे होणा–या मानसीक व शारीरिक त्रासाकरीता भरपाई देण्याची व नवीन वीज जोडणी देण्याची विनंती अर्जदाराने मंचाला केली आहे.

४. गैरअर्जदाराने दिनांक २१.०७.२०१० रोजी आपले उत्तर मंचात दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे कि अर्जदाराने दिनांक १५.०३.२०१० रोजी नवीन वीज जोडणी करीता अर्ज केला आहे. परंतु त्या जागेवर दिनांक १४.०४.१९९३ रोजी श्री शंकर नारायण दारव्हेकर यांना, ग्राहक कं. ४१००१३९६४०६० व मीटर कं. १०९०३८९७ असलेला विद्युत पुरवठा देण्यात आला होता. तसेच दिनांक १८.१०.२००५ च्या विद्युत मीटर निरीक्षण मोहिमेत वरील वीज जोडणीची पाहणी करतांना असे लक्षात आले कि सदर ग्राहकाला वीज जोडणीपासुन विद्युत देयक देण्यांत आले नाहीत. तेव्हा दिनांक २८.१०.२००५ रोजी अर्जदाराला १४.०४.१९९३ ते १८.१०.२००५ पर्यंतचे वापरलेल्या युनीटचे मीटर वाचनानुसार विद्युत देयक देण्यात आले होते, परंतु सदर ग्राहकाने विद्युत देयकाची रक्कम न भरल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा कायम स्वरूपी खंडीत करण्यात आला होता.

५. गैरअर्जदाराने पुढे असे ही नमुद केले आहे कि सदर कायम स्वरूपी वीज पुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकातर्फे जेव्हा ०५.०६.२००९ रोजी विद्युत मीटर मिळण्याबाबत पत्र व्यवहार झाले, तेव्हा कनिष्ठ अभियंता, भगवान नगर यांनी ०६.०७.२००९ रोजी पत्राव्दारे अर्जदाराला थकीत

असलेले रू. ६२,२६७/— भरण्याविषयी कळविले होते. तसेच अर्जदारातर्फे देण्यात आलेल्या पत्रांना वेळोवेळी उत्तर दिले आहेत.

तसेच अर्जदाराने नवीन वीज जोडणी करीता जे कागदपत्र सादर केली आहेत, त्यामध्ये श्री शंकरराव दारव्हेकर, कायम स्वरूपी खंडीत ग्राहक, यांचे नाव जोडलेले आहे व त्याच जागेवर विद्युत वितरण कंपनीचे रू. ६२,२६७/— थकीत आहे. त्यामुळे थकीत असलेली रक्कम भरणा केल्याशिवाय विद्युत पुरवठा देता येत नाही असे स्पष्टीकरण गैरअर्जदाराने मंचात दाखल केलेल्या उत्तरात म्हटले आहे.

६. दिनांक ०५.०७.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्रीमती डी.डी. माडेलवार, उप. कार्यकारी अभियंता व श्री एन. वी. गायकवाड, उपकार्यकारी अभियंता, मानेवाडा उपविभाग हे उपस्थित होते.

श्री विजय हरीभाऊ दारव्हेकर, अर्जदार, यांनी आपली बाजु मांडतांना सांगितले कि त्या जागेवर पुर्वी असलेल्या वीज जोडणी बाबत त्यांना कुठलीही माहिती नाही. त्यामुळे त्या जागेवर असलेल्या थकबाकीशी त्यांच्या संबंध नाही कारण त्यांनी पुर्वी असलेल्या वीज जोडणी वर वीजेचा वापर केला नाही.

७. गैरअर्जदारातर्फे श्री गायकवाड यांनी आपले स्पष्टीकरण सादर केले कि अर्जदाराने ज्या जागेवर नवीन वीज जोडणीची मागणी केली आहे, त्यावर श्री शंकरराव एन. दारव्हेकर या नावाने वीज जोडणी होती. ही वीज जोडणी १९९३ साली देण्यात आली होती. याबाबत पुरावा म्हणुन नवीन वीज जोडणीचे नोंद असलेले एफ/१ रजिस्टरची प्रत गैरअर्जदारातर्फे मंचात सादर करण्यात आली. वीज जोडणीवर

सुनावणी सुरू असतांना मंचाने जेव्हा सदर जागेवरील असलेल्या वीज जोडणीवर १९९३ ते २००५ पर्यंत विद्युत देयक न पाठविण्याचे कारण विचारल्यावर गैरअर्जदार उत्तर देऊ शकले नाहीत.

८. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर मंचात सादर केलेल्या कागदपत्राचे अवलोकन केल्यानंतर मंचाचे असे मत आहे कि अर्जदाराने ज्या जागेवर नवीन वीज जोडणी करीता अर्ज केले आहे. त्या जागेवर पुर्वी श्री शंकरराव दारव्हेकर यांच्या नावाने वीज जोडणी होती. त्या वरील थकीत विद्युत देयक न भरल्यामुळे ती वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्यात आली होती. म्हणजेच अर्जदार हे विद्युत थकबाकी असलेल्या जागेवर नवीन वीज जोडणी ची मागणी करीत आहे. तसेच गैरअर्जदारातर्फे पुर्वीच्या कायमस्वरूपी खंडीत ग्राहकाला वापरलेल्या वीजेचे देयक १९९३ ते २००५ पर्यंत पाठविण्यात आले नाहीत व एकरकमी १५० महिन्याचे देयक ऑक्टोबर २००५ मध्ये देण्यात आले होते. तसेच विद्युत कायदा २००३ कलम ५६ (२) नुसार

"Notwithstanding anything contained in any other law for the time being in force, no sum due from any consumer, under this section shall be recoverable after the period of two years from the date when such sum became first due unless such sum has been shown continuously as recoverable as arrear of charges for electricity supplied and the licensee shall not cut off the supply of the electricity".

त्यामुळे गैरअर्जदार फक्त २४ महिन्याचे देयक वसुल करू शकतो, तेव्हा थकीत असलेली रक्कम रू. ६२,२६७/–, १५० महिन्यात विभाजित करून, फक्त २४ महिन्यात थकीत असलेले देयक गैरअर्जदार वसुल करू शकतो, असे मंचाचे मत आहे.

९. तसेच सुनावणी दरम्यान अर्जदाराला झालेल्या मानसिक व शारीरिक त्रासाबद्दल अर्जदार समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. तसेच त्या जागेवर विज जोडणीतुन अर्जदाराच्याच संबंधीतांनी वीज वापरली आहे व त्यांनी विद्युत देयके न भरल्यामुळे त्या जागेवर थकबाकी निर्माण झाली आहे. तसेच थकबाकी असलेल्या जागेवर थकबाकी वसुल न करता वीज जोडणी देणे कायदेशीररित्या उचित नाही. तेव्हा अर्जदाराला झालेल्या त्रासाबद्दल गैरअर्जदाराला जबाबदार ठरविणे मंचाला योग्य वाटत नाही, त्यामुळे अर्जदाराची भरपाई देण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

1. ज्या जागेवर नवीन वीज जोडणीची मागणी केली आहे, त्याजागेवर थकीत असलेली रक्कम रू. ६२,२६७/–, १५० महिन्यात विभाजीत करण्यात यावी, व त्यापैकी फक्त २४ महिन्याची थकीत असलेली रक्कम गैरअर्जदार अर्जदाराकडुन वसुल करेल.
2. अर्जदाराने वरील थकीत रक्कम भरल्यानंतर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग व्दारा पारित विनियम अनुसार नवीन वीज जोडणी विहीत मुदतीत देण्यात यावी.
3. अर्जदाराची भरपाई मागणी अमान्य करण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य – सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या्